MHLA050010022017

विशेष दिवाणी दावा क्र.९/२०१७

गंगाधर व ईतर वि. संभाजी व ईतर

# आदेश नि.क्र. ४०५

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दाखल करून निशाणी क्रमांक ४०१ च्या आदेशाविरूध्द दाखल करावयाच्या अपिलामधील निर्णय होईपर्यंत सदरचा दावा चालवण्यास १५ दिवसांची मुदत देण्यात यावी अशी मागणी केली आहे.

२) या अर्जावर प्रतिवादींनी म्हणणे देवून आक्षेप घेतलेला आहे. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला.

३) या कामी वादीने पुरावा न दिल्याने वादींचा पुरावा बंद केला होता. तो आदेश रद्द होण्यासाठी नि.क्र. ४०१ वर वादींनी दिलेला अर्ज नामंजूर झालेला आहे. त्या आदेशाविरूध्द वादी मा. उच्च न्यायालयात दाद मागणार आहेत. त्यामुळे मा. उच्च न्याायालयाचा आदेश होत नाही तोपर्यंत उलटतपास घेण्यास मुदत मागितली आहे. प्रस्तुतचा दावा मा. उच्च न्यायालयाने मुदतीत निकाली करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे सदर दाव्यातील चौकशीचे काम दिनप्रतीदिन घेणे आवश्यक आहे. वादींचा पुरावा बंद झाल्याने प्रतिवादींनी त्यांच्या पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामुळे त्यावर उलटतपास घेणे वादीला क्रमप्राप्त आहे. मा. उच्च न्यायालयाने नि.क्र. ४०१ वरील आदेश रद्द ठरवल्यास वादींना त्यांचा पुढील पुरावा देण्याची संधी मिळणार आहे. तोपर्यंत वादींना प्रतिवादींचा उलटतपास घेण्यास मुदत देणे योग्य होणार नाही. म्हणून सदरचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश.

## आदेश

अर्ज नामंजूर केला आहे.

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2022.12.08 17:26:10 +0530

(प्र. अ. सवदीकर)

दिनांक ०८/१२/२०२२. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.